# जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

## जाहीर सुचना

जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, परभणी जिल्हयातील सन 2019-20 या वर्षकरीता वाळू गटांच्या राज्यस्तरीय (SEAC व SEIAA) पर्यावरण समितीची अनुमती मिळविण्याकरीता प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. त्याकरीता जिल्हयातील वाळू गट निश्चित करण्यात आले असून उपलब्ध संसाधनाच्या आधारे जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्रालय नवी दिल्ली यांनी जानेवारी 2020 मध्ये प्रसिध्द केलेल्या वाळू / रेती उत्खनन मार्गदर्शक सुचनेनुसार (Enforcement And Monitoring Guidelines for Sand Mining) सदर अहवाल (DSR) मसूदा (Draft) जनतेच्या माहितीकरीता व अभिप्राय (Comments) नोंदविण्याकरीता https://parbhani.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सबब, मी जिल्हाधिकारी परभणी या द्वारे सर्व जनतेस आवाहन करतो की, सदर अहवालातील रेती घाटांच्या लिलावाच्या अनुषंगाने आपले आक्षेप / अभिप्राय उपरोक्त संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत नोंदवावे. तसेच 03 प्रतींसह खनिकर्म विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी किंवा तहसील कार्यालय सेलू, पाथरी, गंगाखेड येथे नोंदवावेत.

**(दी.म.मुगळीकर,भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी परभणी**

दि. 23/03/2020